संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक १२०१/२०२२
सरकार — वि — पंडीत नि.क्र. १०

# न्यायनिर्णय

(दिनांक १५/०२/२०२३ रोजी अधीघोषीत)

१. आरोपी पंडित डुबा आंबेकर, विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) अंतर्गत खटला पोलीस स्टेशन पांढरकवडा, ता. केळापुर जि. यवतमाळ, तर्फे दाखल करण्यात आला आहे.

२. अपराधाच्या तपशिलानुषंगाने आरोपी विरूध्द ठेवण्यात आलेला आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगाने जप्तीपंचनाम्या वरील पंच सुलोचना त्रंबकराव सोयाम यांची साक्ष नोंदविली.

३. आरोपी विरूध्द गुन्हा दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध न झाल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचा बयान नोंदविण्यात आला नाही. खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता माझे विचारार्थ असुन त्यावर मी सकारण निष्कर्ष नोंदविले आहे.

| अ.क्र | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक २०.०९.२०२२ रोजी १२:०५ ते १२:३५ वाजताच्या दरम्यान मौजा वाठोडा ता. केळापुर, जि. यवतमाळ येथे आरोपी दोन मोहामाच सडव्याचे पिपे प्रत्येकी १५ लिटर प्रमाणे एकुण ६० लिटर मोहामाच सडवा अवैधरित्या बाळगत असतांना मिळून आला काय? | ...नकारार्थी |
| २. | अंतिम आदेश ? | ...अंतिम आदेशानुसार |

**मुद्दा क. १** :—

४. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द आरोप सिध्द करण्याकरीता साक्षीदार सुलोचना त्रंबकराव सोयाम नि.क्र. १० वर तपासले. सरकारी अभियोक्ता आर. एन. गुप्ता यांनी अभिलेखानुसार युक्तीवाद केला. आरोपीचे वकील व्ही.एम.जोशी यांनी आरोपी विरूध्द काहीही निष्पन्न होत नसल्याचा युक्तीवाद केला.

५. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने तसेच वर नमुद साक्षीदाराची साक्ष विचारात घेता असे निदर्शनास येते की साक्षीदार सुलोचना त्रंबकराव सोयाम यानी त्यांच्या सांक्षेत असे सांगितले आहे की, पोलीसांनी त्यांना गोदावरी बोंडे याच्या घरी बोलाविले होते त्यांनी पुढे असेही सांगितले आहे की, आरोपीच्या घरी बॉटल मिळाली होती त्याचा जप्ती पंचनामा पोलीसांनी केला होता सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासणीत असे कबुल केले आहे की, पोलीसांनी त्यांना पंचनामा करीता सुचनापत्र दिले नव्हते सदर प्रकरणांत

जप्तीपंचनामा चे अवलोकन केले असता सदरची जप्ती ही आरोपीच्या घरी केलेली नसुन वाठोडा शेतशिवारात नाल्याच्या काठी करण्यात आली असल्याचे दिसुन येते त्यामुळे सदर साक्षीदाराच्या कथनावर सांशकता निर्माण होते. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने साक्षीदाराच्या सरतपासातही अभिलेखावर आरोपी विरूध्द गुन्हा साबीत होईल असे काहीही आणले नाही.

६. सदर प्रकरणात साक्षिदारांची साक्ष विचारात घेतली असता अभिलेखावर दाखल केलेले दस्ताऐवज सिध्द झाले नाही. या व्यतीरिक्त जप्त मुद्देमाल दारूच होती हे सिध्द करण्याकरीता अभियोगाने रासायनिक विश्लेषकाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही त्यामुळे जप्त केलेली दारूच होती असे सिध्द झाले नाही. कारण सदर प्रकरणात तथाकथीत जप्ती वाठोडा येथील नाल्याच्या काठावर करण्यात आली आहे हे अभियोग पक्ष सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे आरोपी विरूध्दच्या प्रकरणाबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपी संशयाच्या फायदयासाठी पात्र ठरत आहे. करीता मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी देते.

**<u>मुद्दा क्र.२ः—</u>**

७. मुद्दा क्र. १ ला नोंदविण्यात आलेला नकारार्थी निष्कर्षाच्या अनुषंगाने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपी पंडित डुबा आंबेकर, रा.वाठोडा, ता.केळापुर, जिल्हा— यवतमाळ याला कलम २५५(१) फौजदारी प्रक्रिया संहीता अन्वये कलम ६५(ई) महाराष्ट्र दारू प्रतिबंधक कायदा अंर्तगत शिक्षापात्र दोषारोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ४३७—अ प्रमाणे आरोपी यांचे बंधपत्र व जामीनपत्र सहा महिण्यासाठी कायम ठेवण्यात येते.

३) गुन्हयात जप्त मालमत्ता म्हणजे दारू व इतर साहित्य राखुन ठेवले असल्यास अपिल कालावधी संपल्यावर नियमानुसार विल्हेवाट करण्यात यावी.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत)

(कु. अमरीन एम. कासीम)
दिनांक : १५.०२.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
केळापुर — कोर्ट नं. १